## प्रेसनोट दि. ०९.०६.२०२०

**श्री. अंकुश सिताराम कांबळे वय ३८ वर्ष पोलीस पाटील, सावळी ता. मिरज जि. सांगली यांना १५००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

तक्रारदार यांचा सावळी गावातील एका व्यक्ती बरोबर किरकोळ वाद झाला होता. सदर वाद सुरू असताना त्या ठिकाणी सावळी गावातील पोलीस पाटील श्री. कांबळे हे आल्यानंतर त्यांनी तक्रारदार व सावळी गावातील व्यक्तीला एमआयडीसी कुपवाड पोलीस ठाणे येथे घेवून गेल्यानंतर पोलीस पाटील श्री. कांबळे यांनी तक्रारदार यांना तुमची भांडणे मिटवून घेवून पोलीस ठाणेमध्ये कोणतीही तक्रार होवू देत नाही असे सांगून पोलीस पाटील श्री. कांबळे यांनी तक्रारदार यांचेकडे ६०००/- रूपये लाचेची मागणी करून त्यापैकी ४०००/- रूपये तक्रारदार यांचेकडून जागेवर घेवून उर्वरीत २०००/- रूपये आणून दे असे सांगून लाच मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दि.०९.०६.२०२० रोजी तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दिनांक ०९.०६.२०२० रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री. कांबळे पोलीस पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे १५००/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच कुपवाड एम.आय.डी.सी ते मिरज एम.आय.डी.सी कडे जाणाऱ्या रोडवर माणीक हार्डवेअर समोर सापळा लावला असता श्री. अंकुश सिताराम कांबळे वय ३८ वर्ष पोलीस पाटील, सावळी ता. मिरज जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून १५००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने श्री. अंकुश सिताराम कांबळे वय ३८ वर्ष पोलीस पाटील, सावळी ता. मिरज जि. सांगली यांचे विरुध्द एमआयडीसी कुपवाड पोलीस ठाणे येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्रीमती सुषमा चव्हाण सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक व श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कर्मचारी अविनाश सागर, रविंद्र धुमाळ, संजय कलकुटगी, संजय संकपाळ, सलिम मकानदार, राधिका माने, सिमा माने, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in